# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ,
# कृषि नगर, अकोला

---

वाचा:- महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्र. बीसीसी-२०१२/प्र.क्र.३३२/१२/१६-ब, दिनांक १८ मे, २०१३

परिपत्रक

क्र. आस्थापना/जावैप्र/२०१३/955 दिनांक:- १५ जुन, २०१३

**विषय:** मागासवर्गीय प्रवर्गातील कर्मचा-यांबाबत जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी व जात प्रमाणपत्र अवैध ठरल्यास पुढील कार्यवाही बाबत अनुसरावयाची कार्यपध्दती.

विद्यापीठाअंतर्गत यापुर्वी नामनिदर्शनाने/पदोन्नतीने नियुक्त झालेल्या मागासर्वीय कर्मचा-यांना जात वैधताप्रमाणपत्र सादर करण्याबाबत सुचना विद्यापीठाने वेळोवेळी दिलेल्या आहेत. सद्यस्थितीत काही मागासवर्गीय कर्मचा-यांचे जात वैधता प्रमाणपत्र अद्याप प्राप्त झालेले नसल्याचे निदर्शनास आलेले आहे. आता शासनाने उपरोक्त परिपत्रकानुसार याबाबतीत कार्यवाही संबंधी सविस्तर सुचना निर्गमीत केलेल्या आहे.

उपरोक्त संदर्भाकींत शासन परिपत्रकाची प्रत शासनाचे तसेच विद्यापीठाचे संकेतस्थळावर (www.pdkv.ac.in) उपलब्ध करून दिलेली आहे. सदर शासन परिपत्रकाची प्रत संकेतस्थळावरून उपलब्ध करून आपल्या अधिनस्त कार्यरत संबंधीत मागासवर्गीय कर्मचा-यांच्या (अनुसुचीत जाती, अनुसचीत जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागास वर्ग या प्रवर्गामधील) निदर्शनास आणून देण्यात यावे व याबाबत त्यांचे कडुन लेखी पोचपावती घेण्यात येवुन आपल्या स्तरावर संग्रहीत करून ठेवण्यात यावी.

तसेच उपरोक्त शासन परिपत्रकामध्ये निर्देशीत केल्याप्रमाणे, आपल्या अधिनस्त कार्यरत असलेल्या मागास वर्गीय कर्मचा-यापैकी (अनुसुचीत जाती, अनुसचीत जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागास वर्ग या प्रवर्गामधील) ज्यांनी अद्याप जात प्रमाणपत्राची वैधता तपासण्यासाठी जात पडताळणी समितीकडे अर्ज सादर केला नाही अशा कर्मचा-यांनी, आपल्या जात प्रमाणपत्राची पडताळणी करण्यासाठी आवश्यक त्या परिपुर्ण

कागदपत्रांसह विहित अर्ज संबंधीत जात पडताळणी समितीकडे दिनांक ३१.०७.२०१३ पुर्वी आपले स्तरावरून सादर करून त्याबाबतचा अहवाल या कार्यालयास प्रपत्र-१ मध्ये पाठविण्यात यावा. जात वैधता प्रमाणपत्र मिळण्यासाठीचा अर्ज संबंधीत जात पडताळणी समितीकडेच पाठविण्याची खातरजमा कार्यालय प्रमुखाने करावी.

अनुसुचित जमाती प्रमाणपत्राच्या आधारे दि. १५/०६/१९९५ पुर्वी नोकरीस लागलेल्या कर्मचा-यांनी व ज्यांनी अनुसुचित जमातीचे जात वैधता प्रमाणपत्र सादर केलेले नाहीत त्यांना उपरोक्त दिनांक १८ मे,२०१३ चे परिपत्रक व विशेषत: त्यातील परिच्छेद क्र. ५,६,७ निदर्शनास आणुन द्यावे.

१. अनुसुचित जमाती प्रमाणपत्राच्या आधारे दि. १५/०६/१९९५ पुर्वी लागलेले व ज्यांनी अनुसुचित जमाती प्रमाणपत्र पडताळणीसाठी सादर न करता व जात प्रमाणपत्र अवैध होण्याची वाट न पाहता अन्य मागासप्रवर्गात जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र सादर केलेले आहे. अशा कर्मचा-यांनी त्यांचे अनुसुचित जमाती प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र ज्या प्राधिका-यांनी प्रमाणपत्र निर्गमीत केले आहे त्या प्राधिका-याकडे दि. ३१/०७/२०१३ पुर्वी जमा करावे व त्याची **पोच पावती** संबंधीत कार्यालय प्रमुखामार्फत या कार्यालयास सादर करावी.

२. अनुसुचित जमाती प्रमाणपत्राच्या आधारे दि. १५/०६/१९९५ पुर्वी लागलेले व ज्यांचे अनुसुचित जमाती प्रमाणपत्र अवैध ठरले आहे आणि ते ज्या अन्य मागास प्रवर्गाचे आहेत त्या मागास प्रवर्गाचे त्यांनी जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र सादर केले नसल्यास त्या कर्मचा-याने अनुसुचित जमातीचे प्रमाणपत्र संबधीत जात पडताळणी समितीस सादर करावे. व तसे केल्याची **पोच पावती** संबधीत कार्यालय प्रमुखा मार्फत या कार्यालयास पाठवावी आणि ते ज्या मागास प्रवर्गाचे आहे त्या मागास प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र मीळण्यासाठी वरिल पोच पावती व आवश्यक कागदपत्रासह संबंधीत अधिका-याकडे दि. ३०/०६/२०१३ पर्यंत जात प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज सादर करावा व त्याची **पोच पावती** सुध्दा संबंधीत कार्यालयामार्फत या कार्यालयास सादर करावी. अशी प्रकरणे सादर करण्याची दि. ३०/०६/२०१३ ही अंतीम मुदत राहील. तसेच दि. ३१/०७/२०१३ पर्यंत तो ज्या मागास प्रवर्गाचा आहे त्या प्रवार्गाचे जात प्रमाणपत्र त्याने सादर करावे.

३. अनुसुचित जमाती प्रमाणपत्राच्या आधारे दिनांक १५/०६/१९९५ पुर्वी लागलेले ज्या कर्मचा-यांची जात प्रमाणपत्र तपासणी साठी जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे प्रलंबित आहे. किंवा त्यांनी अद्याप जात प्रमाणपत्र पडताळणीसाठी अर्ज सादर केलेला नाही ते कर्मचारी आपण

अनुसुचीत जमातीपैकी असल्याचा दावा सोडुन देवुन, ते ज्या मागासप्रवर्गाचे आहे त्या मागासप्रवर्गाचे जात प्रमाणपत्र आणि जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्याचा विकल्प स्विकारू शकतात. अशा कर्मचा-यांनी रू १००/- च्या स्टॅम्प पेपर वर शपथपत्राव्दारे संबंधीत कार्यालय प्रमुखामार्फत या **कार्यालयास कळवावे** आणि त्यांनी त्या शपथ पत्राची साक्षांकित प्रत संबंधीत जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे सादर करावे व त्यांना त्याचे अनुसुचित जमातीचे मुळ जात प्रमाणपत्र जप्त करण्याची विनंती करावी. ते ज्या मागासप्रवर्गाचे आहे त्या मागासप्रवर्गाच्या जातीचे प्रमाणपत्र काढण्यासाठी आवश्यक कागदपत्रे जात प्रमाणपत्र देणारे प्राधिका-याकडे दि. ३०/०६/२०१३ पर्यंत सादर करून त्या बाबतची **पोच पावती** कार्यालय प्रमुखाकडे सादर करावी.

वरिल प्रमाणे विहित मुदतीत जे कर्मचारी कार्यवाही करणार नाहीत अशा कर्मचा-यांच्या सेवा शासन निर्देशानुसार विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करून तातडीने समाप्त करण्यात येतील याची सर्वांनी नोंद घ्यावी.

संबंधीत मागासवर्गीय कर्मचारी कोणत्याही कारणास्तव अनुपस्थीत असला तरीही या परिपत्रकात सुचित केलेले कार्यवाही प्राथम्याने विहित मुदतीत पुर्ण करण्याची खात्री संबंधीत कार्यालय प्रमुखांनी घ्यावी.

मा.कुलगुरूंच्या मंजुरीने निर्गमीत.

**सोबत:** प्रपत्र १, २ अ,ब,क

कुलसचिव,
डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला

**प्रतिलीपी:**

१.कार्यालय प्रमुख सर्व Officer Incharge, ARTS Cell, Dr.PDKV, Akola
यांना माहिती व आवश्यक कार्यवाही करिता.

२. नियंत्रण अधिकारी प्रमुख सर्व ______________________ यांना माहिती करिता.

३.कुलगुरूंचे स्वीय सहायक, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला यांना माहिती करिता.

विद्यापीठसेवेत कार्यरत असलेल्या मागासवर्गीय कर्मचा-यांनी जात वैधता तपासण्यासाठी सादर केलेल्या अर्जासंबंधी माहिती.

**कार्यालयाचे नांव:-**

| अ.क्र. | कर्मचा-याचे नाव व पदनाम | जात व प्रवर्ग | प्रस्ताव सादर करण्यात आलेल्या समितीचे नांव व पत्ता | प्रकरण सादर केलेल्या पत्राचा क्रमांक व दिनांक | समितीच्या पोच पावतीचा क्र. व दिनांक (प्रत जोडणे आवश्यक) |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | | | | | |

**टिप: दिनांक ३१.०७.२०१३ पर्यंत संबंधित अर्ज सादर करून प्रत्येक प्रकरणी पोच पावती या प्रपत्रासोबत जोडून कुलसचिव कार्यालयास सादर करणे आवश्यक आहे.**

**प्रपत्र- २ (अ)**

दि. १५/०६/१९९५ पुर्वी अनुसुचित जमाती (ST) प्रमाणपत्राच्या आधारे सेवेत प्रवेश केलेल्या परंतु अनुसुचित जमाती प्रमाणपत्राची पडताळणी न करता अन्य प्रवर्गाचे प्रमाणपत्र सादर केलेल्या कर्मचा-या संबंधी माहिती.

**कार्यालयाचे नाव:-** ----------------------------------------------------

| | | |
|---|---|---|
| १ | कर्मचा-याचे नाव व पदनाम | |
| २ | सेवेत प्रवीष्ट झाल्याचा दिनांक | |
| ३ | जात | |
| ४ | अनुसुचित जमाती प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र पडताळणी समितीस सादर केले असल्यास कार्यालयाचे पत्र क्र. व दिनांक | |
| ५ | समिती कार्यालयाची पोच पावतीचा दिनांक (पोच पावतीची प्रत सोबत जोडावी) | |
| ६ | अन्य मागास प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र मिळविले असल्यास त्याची प्रत | |
| ७ | अनुसुचित जमातीचे जात प्रमाणपत्र ज्या प्राधिका-याने दिले आहे त्या प्राधिका-याकडे जमा केल्याचा दिनांक (पोच पावतीची प्रत सोबत जोडावी) | |

कर्मचा-याची स्वाक्षरी

कार्यालय प्रमुखाची स्वाक्षरी

## <u>प्रपत्र- २ (ब)</u>

दि. १५/०६/१९९५ पुर्वी अनुसुचित जमाती (ST) प्रमाणपत्राच्या आधारे सेवेत प्रवेश केलेल्या परंतु अनुसुचित जमातीचे जात प्रमाणपत्र अवैध ठरले आहे. अशा कर्मचा-यांच्या संबंधी माहिती.

<u>कार्यालयाचे नाव:-</u> ------------------------------------------------------------

| | | |
|---|---|---|
| १ | कर्मचा-याचे नाव व पदनाम | |
| २ | सेवेत प्रवीष्ट झाल्याचा दिनांक | |
| ३ | जात | |
| ४ | अनुसुचित जमातीचे जात प्रमाणपत्र ज्या पडताळणी समितीस सादर केले आहे त्या समिती कार्यालयाचे नाव व पत्ता (पोच पावतीची प्रत सोबत जोडावी) | |
| ५ | तो कर्मचारी ज्या मागास प्रवर्गाचा आहे तो प्रवर्ग व त्या प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज सादर केल्याचा दिनांक (दि. ३०/०६/२०१३ पुर्वी) (पोच पावतीची प्रत सोबत जोडावी) | |
| ६ | वरिल रखाना ५ प्रमाणे मिळविलेले जात प्रमाणपत्राचा क्रमांक व दिनांक (दि. ३१/०७/२०१३ पुर्वी) ( प्रत सोबत जोडावी) | |

कर्मचा-याची स्वाक्षरी

कार्यालय प्रमुखाची स्वाक्षरी

## प्रपत्र- २ (क)

दि. १५/०६/१९९५ पुर्वी अनुसुचित जमाती (ST) प्रमाणपत्राच्या आधारे सेवेत प्रवेश केलेल्या परंतु ज्यांनी अनुसुचित जमाती पैकी असल्याचा दावा सोडुन अन्य मागास प्रवर्गाचा विकल्प स्वीकारलेला आहे. अशा कर्मचा-यांच्या संबंधी माहिती.

कार्यालयाचे नाव:- ----------------------------------------------------------

| | | |
|---|---|---|
| १ | कर्मचा-याचे नाव व पदनाम | |
| २ | सेवेत प्रवीष्ट झाल्याचा दिनांक | |
| ३ | जात | |
| ४ | अनुसुचित जमाती पैकी असल्याचा दावा सोडुन अन्य मागास प्रवर्गाचा विकल्प स्वीकारलेला आहे त्याबाबतचे रु १००/- च्या स्टॅम्प पेपवर दिलेल्या शपथ पत्राची प्रत जोडावी | |
| ५ | तो कर्मचारी ज्या मागास प्रवर्गाचा आहे तो प्रवर्ग व त्या प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज सादर केल्याचा दिनांक (दि. ३०/०६/२०१३ पुर्वी) (पोच पावतीची प्रत सोबत जोडावी) | |
| ६ | वरिल रखाना ५ प्रमाणे मिळविलेले जात प्रमाणपत्राचा क्रमांक व दिनांक (दि. ३१/०७/२०१३ पुर्वी) ( प्रत सोबत जोडावी) | |

कर्मचा-याची स्वाक्षरी

कार्यालय प्रमुखाची स्वाक्षरी